# ४. हवामान

१) समताप- समान तापमान.

२) समशीतोष्ण- उष्ण आणि शीत च्या मधली अवस्था.

३) कमाल- जास्तीत- जास्त.

४) किमान- कमीत- कमी.

५) निमशुष्क- अर्धे कोरडे.

६) उच्चभूमी- उच्च भूभाग.

७) अजस्त्र- मोठा, प्रचंड.

८) प्रतिरोध पाऊस- पर्वतरांगांच्या अडथळ्यामुळे पडणाऱ्या पावसाला प्रतिरोध पर्जन्य किंवा पाऊस म्हणतात.

९) अवर्षण- सातत्याने सरासरीपेक्षा खूप कमी किंवा अजिबात पाऊस न पडणे म्हणजे अवर्षण.

१०) ऊर्ध्व- वरील बाजूस गेलेले.

११) क्षीण- झीज.

१२) आवर्त वारे - एखाद्या क्षेत्रात वातावरणातील विशिष्ट बदलामुळे केंद्रभागी कमी दाब आणि सभोवताली जास्त दाब अशी परिस्थिती निर्माण होते. अशा वेळी सभोवतालच्या जास्त दाबाच्या प्रदेशाकडून केंद्रातील कमी दाबाकडे चक्राकार दिशेने वारे वाहतात त्यास आवर्त वारे असे म्हणतात.

१३) वृष्टी- पाऊस.

१४) वैविध्य- विविधता.

१५) वातविन्मुख- वाऱ्याच्या प्रवाहाच्या विरुद्ध.